Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - VII JULY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# प्रेमचंदच्या विचारसरणीचा मराठी साहित्यावर प्रभाव

**डॉ.बालाजी व्ही. डिगोळे**
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

उत्तरप्रदेशमध्ये मौजे लमही-मढही या छोटयाशा गावी प्रेमचंद यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांनी त्यांचे धनमल असे लाडके नाव ठेवले होते. परंपरेने लेखन व्यवसाय घरातून आले. प्रकृतीने प्रेमचंद हे हाडकूळे होते.पण तेजस्वी होते.खोडया करत असत.त्यांचे अभ्यासात लक्ष लागत नसे. त्यांनी लमही गावापासून सव्वा मैल अंतराव एका मौलवीकडे शिक्षण घेतले. गरुसेवा देऊन गुरूला खुश करत असत. जीवनाचा मनसोक्त आनंद लुटला जीवन हे क्रिडा आहे. जग हे रंगभूमी आहे जगाच्या क्रीडांगणावर आपल्या जीवनाचा डाव मांडावा आणि मनसोक्त खेळावा. खेळताना हार होते ती हसत खेळत स्वीकारावी असे सांगत. प्रेमचंद आठ वर्षाचे असतानाच आईचे निधन झाले.वडिलांनी दुसरे लग्न केले. त्यामुळे सावत्रपणा वाटयाला आला. मन उद्विग्न, पोरके, निराश, एकाकी बनले. इथून वाचनाकडे वळले, लेखनाचा छंद लावून घेतला.विविध प्रकारच्या कथा, कादंब-या वाचल्या, पुराणकथा, रेनॉल्ड या लेखकांच्या साहित्याचा अभ्यास केला. उर्दू, फारशी, इंग्रजी, हिंदी भाषेवर प्रभुत्व होते. पुस्तक विक्रेत्याकडे नोकरी करून वाचनाची हौस पुरवली. त्यावेळी एक चांगली गझल लोकांच्या समोर म्हणून दाखवली. त्यांच्या जीवनातले आणखी एक वैपुण्य म्हणजे त्यांचे लग्न झाले. पारंपारिक हिंदु पध्दतीचा ते विरोध करत होते. त्यातून ब्राम्हण पुरोहितशाहिला विरोध केला. शिक्षकीपेशा पत्करला कुटूंबाची सर्व जबाबदारी पार पाडली. ही नोकरी फार काळ टिकली नाही. दुसरी दहा ते बारा रूपयांची नोकरी स्विकारली. वयाच्या पंचविसाव्या वर्षी मुख्याध्यापक म्हणून नोकरी मिळाली. 1909 मध्ये मोहबा नावाच्या गावी उपसंचालक म्हणून नोकरी मिळाली. त्यावेळेला दया नारायण निगम हे एका उर्दू पत्रिकेचे उत्पादक होते. त्यांचे निगम चाहते होते. सूरूवातील ते उर्दू भाषेत लिखाण करत असत. नंतर त्यांना पोटाचा विकार झाला. अशा अनेक आपत्तींनी त्यांच्यावर आघात केला. या सर्व त्यांच्या जीवनातील घटना प्रसंगाचा जीवनानुभवाचा प्रभाव त्यांच्या साहित्यावर पडलेला आहे.जीवनानुभव हे त्यांच्या साहित्याचे प्रमुख वैशिष्टये आहे. कार्लमार्क्स, महत्मा गांधी यांच्या विचारसरणीचा प्रभाव प्रेमचंदावर होता. मराठी लेखकांमध्ये प्रभावाचा धरसोडपणा दिसत नाही. वर्ण, जातिभेद, अस्पृश्यता, तत्कालीन राजकीय परिस्थिती लक्षात घेण्यासाठी त्यांना महात्मा गांधी यांच्या

विचारधारेकडे वळावे लागले. जी स्थिती वामन चोरघडे यांची झाली तीच स्थिती महात्मा गांधी यांच्या प्रभावाची झाली. जीवनातील कटू सत्याचे चित्रण केले. स्वातंत्र्य चळवळीमध्ये सक्रिय जे जे लेखक होते त्यापैकी मुन्शी प्रेमचंदही होते. कथा साहित्य समृध्द करण्यामध्ये प्रेमचंदाचा खुप मोलाचा वाटा होता. त्यांच्या समकालीन कथाकारावर त्यांचा प्रभाव होता. त्यांच्या प्रभावातून तत्कालीन काळात अनेक कथाकार उदयाला आले. प्रेमचंद यांची जीवदृष्टी विचार प्रतिभा आणि चतुराईमुळे हिंदी साहित्य प्रौढ व समृध्द बनले.

पुरोगामी लेखक संघ यामध्ये जेवढे लेखक होते. ते सर्व मार्क्सवादी होते. आर्य समाजसुधारणा आंदोलन महात्मा गांधी याचा सत्याग्रह आणि असहयोग आंदोलन, त्याचबरोबर मार्क्सवादी विचारधारा आपल्या साहित्यातून मांडलेली आहे. पुरोगामी साहित्यालाच त्यांनी जनसाहित्य असे म्हटले आहे. कमलेश्वर, नागर्जून हे लेखक गावोगाव जाऊन लोकामध्ये जागृती घडवून आणायचे.म्हणजे त्यांच्यावर प्रेमचंदाचा प्रभाव पडलेला होता. प्रेमचंदच्या साहित्याचा केंद्रबिंदू कष्टकरी माणूस होता. जो शोषित, पिडीत सर्वसामान्य माणूस त्यांच्या साहित्याचा विषय झाला. मार्क्स, गांधी प्रभावाचा समन्वय करून गुलामगिरी, अंधश्रध्दा, बुवाबाजी, सर्व प्रकारची विषमता, पारतंत्र्य यांचा कडाडून धिक्कार केला. हे करण्यासाठी महात्मा गांधी यांचे तत्वज्ञान उपयोगी पडले. जनवाद, जीवनवाद, समाजवाद, सुधारणा संघर्ष परिवर्तन, क्रांती यावर आधारित साहित्याचे लिखाण केले. संबंध त्यांच्या लेखनात जो आशय सूचित होतो तो विशिष्ट कृतीशील आहे. सुरूवातीला त्यांनी उर्दू भाषेत लिखाण केले. 'सोजेवतन' नावाचा कथासंग्रह लिहिला. यात ब्रिटिश अन्याय अत्याचाराचे चित्रण केले. हा कथासंग्रह ब्रिटिश सरकारने जप्त केला. दया नारायण निगम या त्यांच्या मित्राने त्यांना सुचवले की, "तू टोपणनावाने लेखन कर अडचण येणार नाही". नंतर ते प्रेमचंद या टोपणनावाने लेखन करू लागले. राष्ट्रीय प्रेरणेतून त्यांची मूस तयार झाली होती. त्यांचे लेखन हे पहिल्या महायुध्दाच्या बदलातून पहायला मिळते.म्हणून त्यांच्या साहित्यात मानव संस्कृती यांचे परिवर्तन पहायला मिळते. हे परिवर्तन हिंदूस्थानलाही मान्य होते. विराट मानवी संस्कृतीची धारा व भारतीय जन संस्कृतीची गंगा जी सुरू झाली त्यात प्रेमचंद यांच्या एक डझन कादंब-या व शेकडो कथा महत्वपूर्ण आहेत. कोणताही लेखक या काळात पहिल्या व दुस-या महायुध्दाला तोंड देत होते. यातच प्रेमचंद यांची वाणी भविष्य वर्तविण्यास निर्माण करणारी अशी लोकांना वाटत होती. राजकीय कोलाहल, अनेक समस्या हा प्रेमचंदच्या लेखनीचा विषय

बनला.त्यामुळे अनेक कठीण समस्या त्यांनी पार पाडल्या. या संदर्भात भारतीय जनतेला प्रेमचंद म्हणतात, "हा संत नाही आपणापुढे चला आणखी पुढे चला, जोपर्यंत रंगभूमीवर विजय नाही. तोपर्यंत देशाचा कायापालट होणार नाही. जोपर्यंत कर्मभूमीमध्ये गबन होणार नाही तोपर्यंत हा आमचा देश नवी सेवासदन, एक नवा प्रेमाश्रम निर्माण करणार नाही". 'बडे घर की बेटी' ही पहिली कथा त्यांनी लिहिली. उर्दू लिखाणाला मानधन मिळत नव्हते. तेंव्हा मित्राने पुन्हा सल्ला दिला. तू हिंदी भाषेतून लिखाण कर. पण सुरूवातीला उर्दूत लिहायचे आणि नंतर त्यांचे हिंदी भाषेत लिखाण करू लागले. 'सप्तरोज' हा हिंदी भाषेतला पहिला कथासंग्रह आहे. सेवासदन, प्रेमाश्रम, निर्मला, गबन, कायाकल्प, रंगभूमी, कर्मभूमी, गोदान हे त्यांचे गाजलेले साहित्य शेकडो कथा त्यांनी लिहिल्या. ते एक उत्कृष्ट संपादक, विचारचंत व स्फूट लेखक, म्हणूनही हिंदीत प्रसिध्द आहेत. टॉलस्टॉय यांच्या कथांचेही हिंदी भाषेमध्ये अनुवाद केले आहे. मनाच्या सुप्त अवस्थेतील खेळ चित्रित केले आहे. नवोदित लेखकांशी त्यांचा खूप चांगला संबंध होता. भेदभाव कधीच केला नाही दारिद्रय, लैंगिक शोषण, जातिभेद यांचे चित्रण केले आहे.स्वातंत्र्य सैनिकावर होणारे अन्याय त्यांनी डोळयाने पाहिले.विचारचैतन्य, स्वातात्र्याची आकांक्षा जागवणे हे सैनिकाचे कार्य आहे. हे स्वातंत्र्य प्राप्तीचे हत्यार आहे. समाजात क्रांती झाली पाहिजे ही आकांक्षा त्यांच्या लेखनात होती. पण महात्मा गांधीचे सर्वच तत्वज्ञान पटत नव्हते. -हदय परिवर्तनाचा विचार प्रेमचंदला पटत होता. अंध्यात्मवादी गांधीविचार मात्र पटत नव्हता. त्यांनी आपल्या साहित्यातून ग्रामीण जीवनाची, शेतक-यांची फसवणूक करून शोषण करतात. यावरही लिखाण केले आहे. अन्यायाचा प्रतिकार आपल्या लेखणीतून केला. त्यांचे व्यक्तिमत्वच लेखनशैली म्हणून लिखाणामध्ये अवतरत असे.

हिंदी साहित्य लेखकांचा मराठीवर जो प्रभाव पडलेला आहे त्यात प्रेमचंदाचा प्रभाव मराठी साहित्यावर कसा आहे हे पाहताना आपणास पहिल्या व दुस-या महायुध्दाच्या परिवर्तनवादी मानवतावादी दृष्टीकोनाचा विचार करावा लागतो. घरच्या कुटूंबाचे दुःख सावत्र आईची वागणूक, हे सारे विषय अनेक समस्या राष्ट्रीय भक्ती हे पडसाद मराठीत पहायला मिळतात. त्या सर्व लेखक, कवी, कादंबरीकारांवर प्रेमचंदाचा प्रभाव निश्चित पडलेला दिसतो असे म्हणता येते. प्रेमचंदच्या साहित्यावर महात्मा गांधीच्या विचारधारेचा प्रभाव आहे.तोही मराठी साहित्यात आढळतो. राष्ट्रीय भक्तीचे मानवतावाद व संस्कृती जोपासना जी पहायला मिळते. त्याचाही प्रभाव मराठीत जो पहायला मिळतो. तो प्रथम प्रेमचंदच्या साहित्यात आहे.

इ.स. 1940 नंतर मराठी साहित्याचा काळ सर्वचदृष्टया एका वेगळया जाणिवेने झपाटलेला दिसून येतो. दुस-या महायुध्दाचे पडसाद, युरोपात मानवी संस्कृतीची उलथापालथ प्रचंड प्रमाणात होत होती. यांत्रिकता, बकालपणा व गतिमानता इत्यादींनी मानवी जीवन ढवळून निघाले. नवनवीन शोधांनी ज्ञानाच्या क्षेत्रात भर पडत होती. राष्ट्रा राष्ट्रातील देवाण घेवाण आता सोपी झाली होती. जुनी परंपरा, जुन्या श्रध्दा, जुनी संस्कृती, जुनी मूल्ये यांची झालेली पडझड अनेक लेखकांनी शब्दबध्द केली. त्यांच्या लेखणीवर प्रेमचंदाचा प्रभाव दिसतो. यात गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर, पु.भा. भावे, अण्णाभाऊ साठे, उध्दव शेळके, साने गुरूजी, जयवंत दळवी, आनंद यादव, सुभाष भेंडे हे महत्वपूर्ण कथाकार आहेत. त्यांनी मनाला, भावनेला, जिकडे तिकडे, बजबजपुरी, लोभ-अनुलोभ, अमानुष संघर्ष, क्षुद्रत्वाचा उद्रेक, शालिनतेचे, त्यागाचे मुखवटे घालून मिरवणारे माणूस, विपरीत वाटणारी परिस्थिती गाडगीळांनी अनुभवली. ती त्यांनी विसंगती कथेत मांडली. यात त्यांच्या कडू-गोड नव्या वाटा, स्वप्नभूमी, कबुतरे, काजवा, गुणाकार, तलाावातले चांदणे, खाली असलेले आकाश, बाहुल्यासारखी वागणारी माणसं, विश्वकर्माच्या पाटीवरील रेखोटयांची गुंतावळ, माणसांची झालेली फरफट, एकटेपणा, निराशेपणा, क्रियाशून्यता, वासनेने वखवखलेपण हे विश्व गाडगीळांच्या कथेत प्रेमचंदाच्या प्रभावातूनच निर्माण झाले. मानवी मन हे गुंतागुंतीतूनच निर्माण झाले.मानवी मन हे गुंतागुंतीचे, संमीश्र व अनाकलनीय आहे.त्याचा थांगपत्ता लागणे कठीण आहे. व्यक्तींच्या आचार-विचारातून बोलण्यावरून त्या व्यक्तीचे अनुमान करणे कठीण असते. असेच भाष्य गाडगीळांच्या भाषेतील आकर्षकपणाही प्रेमचंदाच्या प्रभावातून पहायला मिळतो. त्यांची भाषा आशयनिष्ठ अशी आहे. कथानकाच्या बंधनातून सुटणारी कथा माणसाच्या मनातील विविध पापुद्रयाचा ठाव घेणारी कथा, विसंगतीचा योग्य अर्थ लावणारी कथा गंगाधर गाडगीळ रंगवित जातात. तर अरविंद गोखले यांची कथा मानवी जीवनातील गुंतागुंत, विरोध, ध्येयवा, समाजसेवा, दारिद्रय निर्मूलन, अध्यात्मातील फोलपणा व्यक्त करते. मंजुळा, रिक्ता, कातरवेळ, गंधवार्ता, गहिर, देशांतर हे कथासंग्रह त्यांचे प्रसिध्द आहेत. यात 'मंजुळा' या कथासंग्रहावर प्रेमचंदाचा कथेचा प्रभाव पडलेला जवळून दिसतो. तर व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेत दुःखाची दारिद्रयाची, अज्ञानाची, अवहेलनेची स्पंदने आढळतात. माणसाच्या मनातील कंगोरे टिपतात. यावरही प्रेमचंदाचा प्रभाव आढळतो.पुढे बी.रघुनाथ, विद्याधर पुंडलिक, मधू मंगेश कर्णिक, रा.रं.बोराडे, चारूता सागर, छाया दातार, ग.ल. ठोकळ यांच्याही कथांवर प्रेमचंदचा प्रभाव आहे.

कादंबरी वाङमयावर जो प्रेमचंदाचा प्रभाव पडलेला आहे. ते पाहताना आपणास वा. म. जोशी यांचे प्रथम नाव घ्यावे लागते.त्यांची रागीनी, नलीनी, सुशीलेचा देव या कादंब-या भावनाप्रधान व क्रांतीवादी आहेत.त्यानंतर जोशी यांची इंदू काळे

सरला भोळे ही पत्रात्मक कादंबरी लिहीली. यातील पतिनिष्ठ सरला भोळे दारिद्रयातही ध्येयनिष्ठ आयुष्य जगते. ती पतीच्या निधनानंतरही त्यांचे समाजकार्य नेटाने पुढे चालविते. तर दुसरी इंदू काळे विवाहाबद्दलच्या जुन्या रूढी, परंपरा मोडणारी, पतीशी न पटताच घटस्फोट घ्यावा असे माणनारी, तर यातील विनायक गांधीवादी, नारायणराव हा इतिहासंशोधक आहे. हे स्वभावचित्रेही चांगलीच वटलेली आहेत. महात्मा गांधीजींच्या असहकारीतेचा काळ आहे.ध्येयवादी विनायकराव भोळे हे गांधीचे अनुयायी आहेत. या चारही व्यक्तींच्या धडपडी पाहण्यासारख्या आहेत. तर ध्येयवाद हा दुःखमय असतो हे तत्व या दुःखातच सात्विक आनंद भरलेला आहे. पुढे श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी व्यासंगी विचार दीर्घ चिंतन, जगप्रवास, प्रखर व भेदक दृष्टी यातून कादंब-या साकार केल्या. त्यांच्या कादंब-या समाजशास्त्रीय बनल्या आहेत. त्यांचे विचार हे प्रगतीचे व सुधारणावादी दिसतात. 'ब्राम्हणकन्या' ही कादंबरी यातून साकार होते.नंतर वि.स. खांडेकरांच्या कादंब-यावरही प्रेमचंदचा प्रभाव जाणवतो.त्यांची 'ययाती' कादंबरी ही ध्येयनिष्ठा व सामाजिक प्रश्नांची चर्चा करणारी आहे.खांडेकरांचे लेखन हे दुस-या महायुध्दानंतरच्या नैतिक -हासाने हादरून गेलेले असेच आहे. उरली-सुरली माणुसकीही त्यांनी संपलेली पाहिली. सारीच जीवनमूल्ये पायधुळीला तुडवली जात होती. आत्म्याच्या पावित्र्यापेक्षा व सामाजिक जीवनाच्या शुध्दतेपेक्षा आपल्या चैनीची, मौज मजेची कदर ज्याला वाटते. ते दृश्य डोळयांनी त्यांनी पाहिले व मांडले आहे. सत्य व दंभ, त्याग व लोभ, मानवता व दानवता हे त्यांना अस्वस्थ करत होते. याच दुख-या मनाने शोध घेता घेता त्यांनी कादंब-या लिहिल्या आहेत. त्यावर प्रेमचंदचा प्रभाव आहे. ग.त्र्यं.माडखोलकर हे पत्रकार, भाष्यकार, समीक्षक असल्यामुळे पत्रव्यवसायाचा, राजकाराणाचा प्रदीर्घ अनुभव कादंबरीत दर्शविला.मुक्तात्मा व भंगलेले देऊळ या त्यांच्या सुरूवातीच्या दोन कादंब-या आहेत. राजकीय विषयावर 'मुक्तात्मा' ही कादंबरी असून यात टिळकांच्या नंतरच्या कालखंडातील राजकारण्यांची चर्चा कथानकाच्या ओघात आली आहे. जहाल मवाळ राष्ट्रीय गांधीचे राजकारण व त्यांचे विरोधक नवीन समाजवाद, इतिहास संशोधनात रमलेले पण देशभक्तांच्या गुप्त बातम्या सरकारला पुरविणारे रावबहादूर देशमुख असे व्यक्तिचित्र येतात. तर भंगलेले देऊळ ही कादंबरी म्हणजे भग्न -हदयी मानीनीची कथा होय. प्रचलित विवाह संस्था म्हणजे एक भंगलेले देऊळ होय नष्ट झालेले असेल तर तुमच्या कल्पनेप्रमाणे त्याचा जिर्णोध्दार करा. पण ते अजिबात पाडून टाकून मानव जातीच्या हाती स्वैराचाराची सनद मात्र देऊ नका असा संदेश या कादंबरीत आहे. शेवटी मानव जातीचे कल्याण हे स्वैराचारात नसून ते संयमात आहे. भोगात नसून त्यागात आहे.हा अनुचा संदेश आहे तर चंदनवाडी या कादंबरीत ग्रामीण जीवनातील समस्यांची चर्चा आहे. वरेकर, हडप यांनीही पुढे सामाजिक व ऐतिहासिक कथा, कादंब-या लिहिल्या त्या साम्यवादावर आधारित आहेत. पु.य. देशपांडे, शांताबाई नायिकाकर, ग.ह. कुलकर्णी, अ.ब. कोल्हटकर यांच्याही कादंब-यावर प्रेमचंदचा प्रभाव आहे. राजकीय विचारांचा, प्रसंगाचा आधार घेऊन काही कादंब-या प्रसंगाचा आधार घेऊन काही कादंब-या ज्या निर्माण झाल्या त्यात न.चि.केळकर, एकनाथ यादव, निफाडकर यांच्या महात्मा गांधी सैतान की साधू, खरा देशभक्त, वा.कृ.भावे, थोरली आई, दा.न. शिखरे, दडपशाही, सी.शी. लोटलीकर प्राणाहुती या राजकीय जागृतीच्या संदर्भातील महत्वपूर्ण कादंब-यावरही प्रेमचंदचा प्रभाव पडलेला आहे.

अशा प्रकारे मराठी वाङमयातील कथाकार व कादंबरीकारावर प्रेमचंदाचा प्रभाव आहे. पुढे विभावरी शिरूरकर या स्त्री कादंबरी लिखिकेवरती प्रेमचंदचा प्रभाव जाणवतो. त्यांच्या कादंब-या म्हणजे सामाजिक, कौटूंबिक, राजकीय असून स्त्री कादंबरी मनाच्या विविध पापुद्रयांचे थोडे बंडखोर चित्रण करतात. जाई व शबरी या शिरूरकरांच्या कादंब-या म्हणजे सुशिक्षित स्त्रियांच्याही वैवाहिक जीवनात विलक्षण प्रकारच्या समस्य उभ्या करतात. गीता साने यांच्या कादंब-या म्हणजे स्त्री दुःख, समान हक्क, आर्थिक स्वातंत्र्य, साम्यवाद यावर आधारीत असून त्यांनी मध्यमवर्गीय कुटूंबातील नात्यावर चर्चा केली. त्यांच्यासोबतच मालतीबाई दांडेकरांनीही अनेक कादंब-या लिहिल्या.त्यात कौटुंबिक समस्या संयमशील वृत्तीने त्यांनी मांडल्या आहेत. त्यांची विचारसरणी वास्तववादी आहे. तर प्रेमा कंटक यांनी महात्मा गांधीच्या ध्येयवादावर व अहिंसा, सत्य, संयम इत्यादी गुणांवर निष्ठा असणा-या या कादंब-यात काय आणि कामीनी, अग्नियान या कादंब-या लिहिल्या आहेत. यानंतरच्या काळात बोकील साने गुरूजी यांनी ज्या कादंब-या लिहिल्या. यात संसारिक गोष्टी लटके झटके झगडे असे विशेष आहेत. कवठेकर यांनी मध्यमवर्गीय कुटूंबातील सुख दुःखाचे चित्रण उभे केले आहेत. गांधीवादाचा जीवनमार्ग पत्करून ध्येयाची वाटचाल करणा-या साने गुरूजींच्या कादंब-या म्हणजे प्रेमचंदाचा तंतोतंत प्रभाव म्हणता येईल. स्वतंत्र्याची चळवळ स्वर्थ, त्याग, बंधूभाव, समत्व करूणा हे सारे विषय सानेगुरूजीच्या जवळचे आहेत. त्यांची 'श्यामची आई' ही कादंबरी त्यामुळेच लोकप्रिय आजही आहे. संस्कारहीन अशा नव्या समाजरचनेत सुसंस्काराचे हे उदात्त व करूण चित्र ते वाचकापुढे मांडत जातात. धडपडणारी मुले, श्याम जीवनकलह, पुर्नजन्म, क्रांती, तीन मुले, रामाचा शेला, सती, संध्या, चित्रकार रंगा, नवा प्रयोग या कादंब-या ध्येयवादाची जोपासना करताना दिसतात. सानेगुरूजीच्या लेखणीवर कळत नकळत प्रेमचंदचा खूप मोठा प्रभाव आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही.

**निष्कर्ष :-**

1) प्रेमचंद यांना जीवनात त्यांना युध्दाचा प्रसंग करत संघर्ष करावा लागला. प्रेमचंदाच्या जीवनातील अनेक घटना प्रसंगाचा प्रभाव साहित्यावर पडला आहे.
2) प्रेमचंदवर कार्लमार्क्स व महात्मा गांधी यांच्या विचार सरणीचा प्रभाव आहे. त्याचबरोबर जीवनातील कुटूंबसत्याचे चित्रण त्यांच्या साहित्यातून मांडले.
3) प्रेमचंदच्या साहित्यावर पहिल्या व दुस-या महायुध्दाचा परिणाम झाला आहे. मानवी संस्कृतीचे परिवर्तन त्यांच्य साहित्यात पहायला मिळते. विराट मानवी संस्कृतीचे दर्शन त्यांच्या साहित्यातून घडते.
4) गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर, पु. भा.भावे, उध्दव शेळके, श्रीधर व्यंकटेश केतकर, वि.स. खांडेकर, सानेगुरूजी, वा.म. जोशी, इत्यादी लेखकावर प्रेमचंदाचा प्रभाव पडलेला आहे.

**संदर्भग्रंथ :-**

1) प्रेमचंद, ‘गबन’, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, आवृत्ती 1999
2) (संपा.) निशिकांत ठकार, ‘कथनमीमांसा और कहानी’, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक, पुर्नमुद्रण, 2009
3) डॉ. वसंत बिरादार, ‘आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास’,
4) हरिश्चंद्र थोरात, ‘कथनात्म साहित्य आणि समीक्षा’, शब्द पब्लिकेशन, मुंबई , आवृत्ती 1 ली 2011
5) अ.ना. देशपांडे, ‘आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास’, व्हीनस प्रकाशन, पुणे, पुर्नमुद्रण, 1970
6) रा. श्री. जोग, श्री. ना. बनहट्टी, ‘प्रदक्षिणा’, (खंड पहिला), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुर्नमुद्रण 1993
7) डॉ. आनंद पाटील, ‘तौलनिक साहित्य : नवे सिध्दांत आणि उपयोजन’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद 1998
8) गुरूवर्य डॉ. श्रीराम गूंदेकर यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन (एम.फील. 2007 ते 2008)